कंत्राटी पदभरती जाहिरात

राष्ट्रीय आयुष अभियान

जिल्हा आरोग्य सोसायटी पुणे,महाराष्ट्र

जिल्हा आरोग्य सोसायटी,जिल्हा परिषद पुणे अंतर्गत कंत्राटी रिक्त पदे संवर्गनिहाय भरावयाची आहेत.

जाहिरात शुद्धिपत्रक दिनांक १२ / ३ /२०२४

| अ. क्र. | पदाचे नाव | पदाची संख्या | नियुक्तीचे ठिकाण कार्यक्रम नाव | शैक्षणिक अर्हता व अनुभव | संवर्ग | एकत्रित मानधन र. रु.प्रती महा |
|---|---|---|---|---|---|---|
| १) | जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक | १ | जिल्हा आयुष रुग्णालय औंध पुणे | Graduation degree in any discipline including AYUSH and MBA in Healthcare Management/Masters in Health/Hospital administration/Post Graduation Diploma in Hospital & Healthcare Management (Two years) from AICTE recognized Institute with Minimum 3 Years working experience in public health Programme. Exposure to social sector schemes/Missions at the national, state, and district level and computer knowledge including MS Office, MS Word, MS power Point, MS Excel would be desirable. Preference will be given to persons having experience of working in the Health Sector including AYUSh | खुला | ३५,०००/- |
| २) | अकाऊंटंट ऑफिसर कम डाटा एन्ट्री ऑपरेटर | १ | जिल्हा आयुष रुग्णालय औंध पुणे | Any Graduation with a certificate passing from GCC in Typing speed 40 w.p.m in English AND 30 w.p.m in Marathi, Preference will be given to the experienced person. | खुला | १८०००/- |

अटी व शर्ती:-

१) उपरोक्त पदे ही कंत्राटी स्वरुपाची असून नियुक्ती दि.२९/०६/२०२४ पर्यंत राहील.

२) जाहिरातीतील पदे राज्य शासनाची नियमित पदे नसून निव्वळ कंत्राटी स्वरुपातील पद आहेत. सदर पदावर कायमपणाचा हक्क राहणार नाही तसेच या पदांसाठी शासनाचे सेवा नियम लागु नाही. तसेच अर्जदाराला शासकिय नियमित सेवेत सामावून घेणे किंवा शासनामार्फत सेवा संरक्षण किंवा त्यासंबंधी दावा करण्याचा अधिकार राहणार नाही.

राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत विविध पदांच्या पदभरतीच्या अनुषंगाने राबविण्याची प्रक्रिया राष्ट्रीय आयुष अभियान अंतर्गत पदभरतीसाठी अवलंबन करण्यात येत असल्याने पात्र उमेदवरांना पुढील तक्त्यात नमूद केलेप्रमाणे गुण देण्यात येणार आहे.

| विवरण | तपशील | अधिकतम गुण |
|---|---|---|
| पदासाठी आवश्यक Qualifying मधील गुण (अंतिम वर्षाच्या गुणांच्या आधारे) | मिळालेल्या एकूण गुणांच्या टक्केवारीचे ५० प्रमाणे Proportion काढावे. (उदा ६०% गुण प्राप्त असल्यास त्याचे ५०% प्रमाणे Proportion = ६० x २०/१००=30) | ५० गुण |
| पदासाठी आवश्यक शैक्षणिक अर्हतेपेक्षा अधिक शैक्षणिक अर्हता असल्यास (संबंधीत विषयामध्येच अधिकची शैक्षणिक अर्हता असल्यास विचारात घ्यावी.) | अधिकतम २० गुण द्यावेत.<br>मिळालेल्या एकूण गुणांच्या टक्केवारीचे २० प्रमाणे Proportion काढावे. (उदा १ स्टाफ नर्स पदाची आवश्यकता शैक्षणिक अर्हता पूर्ण करून अतिरिक्त बी.एस.सी. नर्सिंग हि शैक्षणिक अर्हता पूर्ण केलेल्या उमेदवाराने अर्ज केला असल्यास उमेदवारास बी.एस.सी. नर्सिंगच्या अंतिम वर्षात ६०% प्राप्त असल्यास त्याचे २०% प्रमाणे Proportion = ६०x २०/१००=१२) | २० गुण |
| संबंधीत पदाशी निगडीत अनुभव | प्रत्येक १ वर्षासाठी ६ गुण द्यावेत (१ वर्षाकरिता ६ गुण, जास्तीत जास्त ३० गुण) | ३० गुण |
| | | **एकूण १०० गुण** |

१) सदरची पदे राज्यशासनाची नियमित पदे नसून पुर्णतः कंत्राटी तत्वावर आहे.

२) इच्छुक उमेदवारांनी दि.12/03/२०२४ व दि.26/03/२०२४ रोजी सायं.०६ वाजे पर्यंत ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करावा.अर्जा सोबत जन्म तारखेकरीता (वयाचा दाखला/दहावीची टीसी/सनद/जन्म प्रमाणपत्र) फोटो आयडी/रहिवाशी दाखला,शैक्षणिक अर्हताा प्रमाणपत्र(शेवटच्या वर्षाची गुणपत्रिका/रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र/अतिरिक्त शैक्षणिक अर्हतेची एमएमसी नोंदणी/नोंदणी नूतनीकरण/अनुभव प्रमाणपत्र)जातीचे प्रमाणपत्र/उमेदवाराने अर्जात स्वतःचे नाव,सामाजिक प्रवर्ग,कोणत्या प्रवर्गातून अर्ज करु इच्छित आहे तो प्रवर्ग,जन्म दिनांक भ्रमणध्वनी क्रमांक व ईमेल आयडी इ.माहिती काळजीपूर्वक भरावी.शासकिय,निमशासकिय संस्थांमध्ये केलेल्या कामाचे अनुभव प्रमाणपत्र यामध्ये राष्ट्रीय आरोग्य अभियान मध्ये काम केलेल्या उमेदवरांना प्रधान्य देण्यात येईल. सद्याचा पासपोर्ट साईज फोटोसह सोबत जोडलेल्या लिंक https://cha.maha-arogya.com वर जाऊन अर्ज सादर करावा.

३) अर्जा सोबत खुल्या प्रवर्गातील उमेदवारांसाठी र.रु.३००/- आणि मागास प्रवर्गाच्या उमेदवारांसाठी र.रु.२००/- राहिल.

४) उमेदवारांकडून सदर ऑनलाईन अर्ज अर्धवट,अपूर्ण वाचण्यायोग्य नसलेला अर्ज सादर केला असल्यास संबंधित उमेदवाराचा अर्ज नाकारला गेल्यास अथवा अपात्र ठरला गेल्यास त्याबाबतची सर्वस्वी जबाबदारी संबंधित उमेदवराची राहील. याबाबत उमेदवारांकडून कोणत्याही स्वरुपाची तक्रार स्वीकारली जाणार नाही.

५) पदभरतीचे अर्ज ऑनलाईन पध्दतीनेच घेण्यात येत असल्याने कोणत्याही उमेदवाराने कार्यालयात प्रत्यक्ष भेट देवू नये. तसेच राष्ट्रीय आरोग्य अभियान कार्यालयामध्ये कोणत्याही प्रकारचे अर्ज स्वीकारले जाणार नाही याची नोंद घ्यावी

६) उमेदवरास प्रसिध्द केलेल्या जाहिरातीमधील एकापेक्षा अधिक पदांकरीता अर्ज करावयाचे असल्यस अशा प्रत्येक पदासाठी स्वतंत्र अर्ज सादर करुन त्यासाठी स्वतंत्र शुल्क भरणे बंधनकारक राहील.

७) महिला उमेदवरांनी त्यंच्या नावात काही बदल असल्यास(लग्नापूर्वीचे नाव,लग्नानंतरचे नाव) त्या संदर्भात आवश्यक कागदपत्रे,विवाह नोंदणी दाखला जमा करणे आवश्यक आहे.

८) तद्नंतर अर्जाची छाननी करुन उमेदवारांची पात्र/अपात्र यादी इ. बाबत सविस्तर माहिती जिल्हा परिषदचे संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

९) निवड/नियुक्ती प्रक्रिया कोणत्याही टप्प्यावर,कोणतेही कारण न देता बदल अथवा रद्द करण्याचे व जाहिरात दिलेली पद संख्या किंवा ठिकाण बाबत अधिकार मा.मुख्य कार्यकारी,जिल्हा परिषद पुणे यांनी राखून ठेवले आहे.

१०) निवड यादीतील गुणाक्रमांकाचे आधारे प्राधान्यक्रम पदस्थापना दिली जाईल.याबाबत उमेदवाराने कोणत्याही दबावतंत्राचा वापर केल्यास सदर उमेदवाराची निवड रद्द करण्यात येईल.

XXX

मुख्य कार्यकारी अधिकारी
तथा अध्यक्ष,
राष्ट्रीय आरोग्य अभियान,जि.पुणे